# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
## अल्प मुदतीची निविदा सूचना
### ४ थे जाहीर प्रसिद्धी करण

मा.महाराष्ट्र शासन 2011 चा अद्यादेश क्रं.12 नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दि.21 मे 2021 सोलापूर महानगरपालिका, आरोग्य खाते अंतर्गत खालील कामाकरीता दोन लिफाफा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | कामाचे वर्णन | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| 1 | सोमपा आरोग्य खाते अंतर्गत शहरी आरोग्य वर्धिनी केंद्राकरीता नीलम नगर व शांती नगर येथे भाडेतत्वावर इमारत घेणेकामी मनपा संकेत स्थळावर जाहीर प्रसिद्धीकरण करणे. | 500/- | वर्क ऑर्डर दिल्यापासून 8 दिवस |

शर्ती व अटी:-

1)दरपत्रके दि 7 / 3 /2024 ते दि. 14 / 3 /2024 पर्यंत दुपारी 1.00 वाजेपर्यंत मुख्य लेखापाल कार्यालय मनपा येथे सादर करावयाचे आहे.

X2)बयाणा र.रु.—-----------------/- दि.~~7 / 3 /2024~~ ते दि.~~13 / 3 /2024~~ अखेर दु.1.00 वाजेपर्यंत मुख्य लेखापाल कार्यालयात मनपा येथे रोखीने भरावयाचे आहे.

3)दरपत्रक लेटर पॅडवर नमूद करुन बंद पाकिटात सदर करावयाचे आहेत. बंद पाकीट क्रं.1 तांत्रिक लिफाफा खालील आवश्यक कागदपत्रे बंद पाकिट क्रं.2 वित्तीय लिफाफा.

4) दयावयाचे दर हे सर्व शासकीय करासहित द्यावयाचे आहेत.

| लिफाफा क्र.१ तांत्रिक लिफाफा | लिफाफा क्र. २ दरपत्रक लिफाफा |
|---|---|
| १ घर मालकाचे pancard<br>२ मालमत्ता कर पावती , मालमत्ता कर विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र<br>३ चालू लाईट बिल | Letter pad वर सही शिक्यानिशी दरपत्रक देणेत यावे. |

अति.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

अटी व शर्ती :-

( टिपः सदर करारनामा रु.१००/- च्या स्टँप पेपरवर नोटरी करुन सादर करणे )

१.मालमत्तेचे विवरण चतु:सीमेसह दयावे.

२. भाडे करारावर देण्यात येणारी मालमत्ता हि स्वतःच्या मालकीची असावी.

३. उपरोक्त मालमत्तेचे प्रयोजन १५ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातुन राबविण्यात येण्या-या शहरी आरोग्यवर्धीनी केंद्राच्या स्थापनेकरिता करण्यात येणार आहे.

४. सदर जागेचा भाडेतत्वावरील करार हा कराराच्या दिनांकापासून ११ महिने इतका राहील.

५. सदर मालमत्तेच्या उपभोगाकरीता दरमहा (अंकात) रुपये ------(अक्षरी) रुपये----------- सोमपा व इमारत मालक यांचे दरम्यान करारपत्र झालेनंतर दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या दरानुसार तसेच रेडीरिकनर दर विचारात घेऊन देण्यात येईल. भाडेवाढ कोणत्याही परिस्थतीत होणार नाही.

६. सदर इमारतीचे हस्तांतरण करतेवेळी इमारत मालकांनी सदर इमारतीचे कर, पाण्याची देयके, विद्युत देयके तसेच इतर सर्व कर निरंक करुन हस्तांतरीत करावे.

७. सदर करारा दरम्यानच्या कालावधीमधील महानगरपालिका अंतर्गत भरावयाचे मालमत्ता कर इमारत मालकांनी भरावयाची आहे.

८. इमारत मालकांनी सदर करारा दरम्यानच्या कालावधीमध्ये इमारतीमध्ये किंवा इमारती आवारामध्ये बांधकाम, नुतनीकरण करु नये परंतु करार केल्यानंतर सोमपा यांनी परिस्थितीजन्य विचार करता विनंती केल्यास पार्टी क्रमांक १ यांनी सदर इमारतीची दुरुस्ती करावी. (उदा. लाईट, पाणी, नालेसफाई व इतर किरकोळ दुरुस्ती.)

९. आरोग्य विभागाकडून सुचविण्यात आल्या प्रमाणे सदर इमारतीचा ताबा देण्यापुर्वी रंगरंगोटी, दुरुस्ती करुनच सदर इमारतीचा ताबा देण्यात यावा.

१०. नमुद कालावधीमध्ये इमारतीच्या विद्युत व्यवस्थेत व पाणी पुरवठा बाबतीत बिघाड झाल्यास, सदर बिघाड दुरुस्त करण्याची जबाबदारी इमारत मालकाची असेल. तसेच विद्युत व्यवस्था, पाणी व्यवस्था यांचा सुयोग्य वापर व देखभाल करणे ही जबाबदारी भाडेकरूची असेल.

11. प्रस्तुत इमारतीचा नकाशा सोबत जोडला असुन तो नकाशा या प्राथमिक करारपत्राचा भाग असून तो आरोग्य विभाग व लिहून घेणार यांचे कार्यालयाचे अभिलेखावर आहे. तथापि सदर इमारतीचे पुढीलप्रमाणे बाबी नसल्यास ( जसे- मंजूर अंतिम ले आउट / बांधकामाची नील प्रत / बांधकाम परवाना / वापर परवाना) तसेच सदर इमारत हि गुंठेवारी जमिनीवरील बांधकाम असल्यास अशा इमारतीच्या बाबतीत भविष्यात अथवा कोणतेही आदेश निर्गमित झाल्यास व त्यामध्ये सदर इमारत जर अनधिकृत अथवा अतिक्रमण असल्याचे निदर्शनास आल्यास अशा वेळी कोणतेही कारण न देता सदरचा करार हा रद्द करण्यात येईल.याबाबतचे सर्व अधिकार सोलापूर महानगरपालिकेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

Scanned with CamScanner

12. सदर जागा या आरोग्य विभागाअंतर्गत अत्यावश्यक सेवेकरीता व तातडीची बाब म्हणून भाडेतत्वावर घेण्यात येत आहेत. सदर कराराच्या आधारे कोणत्याही परिस्थितीत बांधकाम नियमितीकरण करण्यात येणार नाही. अथवा त्याआधारे मनपा प्रशासनावर बांधकाम नियमित करणेबाबत दबाब आणता येणार नाही असे आढळल्यास सदरचा करार हा एकतर्फी संपुष्ठात आणण्यात येईल.

१३. सदर इमारतीबाबत भविष्यात वाद विवाद किंवा काही अडचण निर्माण झाल्यास भाडेकरार आपोआप संपुष्टात येईल.

१४. सदर करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार मा. आयुक्त, सोमपा. यांच्याकडे असेल.

१५. किमान ५०० स्क्वे.फुट असे चटई क्षेत्र आवश्यक आहे.

१६. सदर जागा तळमजल्यावर व दिव्यांग व्यक्तींना येणे-जाणेकरिता सोयीची असावी.

१७. सदर जागे मध्ये आयोग्यवर्धीनी केंद्र कार्यान्वीत राहणार असल्याने डॉक्टर कन्सल्टींग रूम, इंजेक्शन रूम, वेटींग रूम, फार्मसी रूम, वेलनेस रूम. नोंदणी कक्षकरिता स्वतंत्र सोय असलेले असावे. उपरोक्त बाबीकरिता मालमत्ता धारकाने व्यवस्था करावयाची आहे.

१८. सदर जागेमध्ये स्त्री-पुरुष करिता स्वतंत्र स्वच्छतागृह, पार्किंगची व्यवस्था आवश्यक आहे.

१९. कन्सल्टींग रूम, प्रोसेजर इंजेक्शन रूम व स्वच्छतागृह येथे बॉश बेसीन आवश्यक आहे

२०. वापरावयाच्या पाण्याची व्यवस्था जागामालकाने करावयाची आहे.

२१. जागेचे म्युनिसीपल व इतर टॅक्स जागामालकाने भरावयाचे आहे.

२२. सदर जागेची देखभाल व दुरुस्ती करावयाची जागामालकाने करावे.

२३ . जर काही कारणाने शासनाचे अनुदान बंद झाल्यास सदर जागेचा करार रद्द करण्यात येईल.

२४. सर्वात कमी भाडे दिलेल्या जागा मालकाने इमारत हस्तांतरित करण्याच्या अगोदर वार्षिक भाड्याच्या २ टक्के सुरक्षित रक्कम भरल्यानंतर भाडे हस्तांतरीचे करारपत्र करून द्यावे.

२५. सदर कराराच्या बाबतीत मा.आयुक्त , सोलापूर महानगरपालिका यांनी दिलेले आदेश अंतिम राहतील.

अति.आयुक्त

सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner